सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत वितरण करण्यात येणाऱ्या जिवनावश्यक वस्तूंवर देखरेख ठेवण्यासाठी विविध स्तरांवर गठीत करण्यात आलेल्या दक्षता समित्यांच्या कामकाजाबाबत मार्गदर्शक सूचना.

महाराष्ट्र शासन
अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
शासन परिपत्रक क्रमांक - संकिर्ण-१५१९/प्र.क्र.१०/ना.पु.२१
मंत्रालय, मुंबई-४००० ३२.
दिनांक : ०५ एप्रिल,२०१९

वाचा:

१) शासन निर्णय क्रमांक दक्षस-१००७/प्र.क्र.५४८/नापु २१, दि. २३ जानेवारी, २००८
२) शासन निर्णय क्रमांक दक्षस-१००७/प्र.क्र.५४८/नापु २१, दि. ०३ जुलै, २००९
३) शासन निर्णय क्रमांक दक्षस-१०१०/प्र.क्र.१२९/नापु २१, दि. २१ ऑक्टोबर, २०१०
४) शासन परिपत्रक क्रमांक दक्षस-१०११/प्र.क्र.२०७-११/नापु २१, दि. ०३ डिसेंबर, २०११
५) शासन परिपत्रक क्रमांक दक्षस-१०१२/प्र.क्र.७९-१२/नापु २१, दि. २८ मार्च, २०१२
६) शासन परिपत्रक क्रमांक दक्षस-१३१३/प्र.क्र.९०/नापु २१, दि. १८ फेब्रुवारी, २०१३
७) राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३, दिनांक १० सप्टेंबर २०१३
८) शासन परिपत्रक क्रमांक दक्षस-१३१५/प्र.क्र.५/नापु २१, दि. ८ जानेवारी, २०१५

परिपत्रक

उपरोक्त क्रमांक १ येथील शासन निर्णय दिनांक २३ जानेवारी २००८ नुसार सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत वितरण करण्यात येणाऱ्या जिवनावश्यक वस्तुंवर देखरेख ठेवण्यासाठी राज्य शासनाने राज्यात ग्राम, तालुका, नगरपालिका, महानगरपालिका व जिल्हा स्तरावर दक्षता समित्या गठीत केल्या असून या विविध स्तरांवरील दक्षता समित्यांच्या बैठका दरमहा नियमितपणे घेण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच उपरोक्त क्रमांक ३ अनुसार सर्व स्तरावरील दक्षता समित्यांच्या नियमित बैठका आयोजित न करणाऱ्या संबंधित सदस्य सचिवांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याचे निर्देश संबंधित जिल्हाधिकारी यांना देण्यात आले असून संदर्भाधिन क्रमांक ४ व ५ येथील शासन निर्णयान्वये अशा कारवाईचा अहवाल शासनास सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. उपरोक्त क्रमांक ८ येथील शासन परिपत्रकानुसार सर्व स्तरावरील प्रत्येक दक्षता समित्यांची बैठक महिन्यातून एकदा घेण्याबाबत व सदर बैठकांबाबत जनतेला माहिती होण्यासाठी बैठकांच्या आयोजनाबाबत वृत्तपत्राद्वारे व्यापक प्रसिध्दी देण्यासंदर्भात तसेच सर्व स्तरावरील दक्षता समित्यांच्या बैठकांबाबत त्रैमासिक अहवाल तिमाही समाप्तीनंतर पुढील महिन्यांच्या १५ तारखेपर्यंत आणि आर्थिक वर्षाचा एकत्रित अहवाल एप्रिल महिन्याच्या २० तारखेपर्यंत शासनास सादर

करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. तथापि, यासंदर्भात शासनाने घेतलेल्या आढाव्यामध्ये दक्षता समित्यांच्या बैठका नियमितपणे घेतल्या जात नसल्याची बाब शासनाच्या पुन्हा एकदा निदर्शनास आली आहे. या पार्श्वभूमीवर या परिपत्रकान्वये खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

“सर्व स्तरावरील दक्षता समित्यांच्या बैठकांबाबतचा मासिक अहवाल पुढील महिन्यांच्या १५ तारखेपर्यंत आणि आर्थिक वर्षाचा एकत्रित अहवाल एप्रिल महिन्याच्या २० तारखेपर्यंत शासनास सादर करण्यात यावा”.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१९०४०५१७०४२९८५०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

Charushila Chandrakant Tambekar

Digitally signed by Charushila Chandrakant Tambekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=332dfd6e6db0a06570cca25f9c39add2bebc7d207b3405d11e474330d0a9e014, cn=Charushila Chandrakant Tambekar
Date: 2019.04.05 17:16:49 +05'30'

(चारुशीला तांबेकर)
सहसचिव
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

प्रति,

१. सर्व विभागीय आयुक्त.
२. सर्व विभागीय उपआयुक्त (पुरवठा),
३. सर्व जिल्हाधिकारी
४. नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा मुंबई,
५. वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
६. संचालक, नागरी पुरवठा, (गोदाम/वाहतूक), मुंबई.
७. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी.
८. सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी.
९. सर्व तहसिलदार.
१०.मा. मंत्री (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण) यांचे खाजगी सचिव.
११.मा. राज्यमंत्री (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण) यांचे खाजगी सचिव.
१२.सर्व कार्यासने, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३.निवडनस्ती/(कार्यासन नापु २१).